**पोलीस आयुक्त, कार्यालय पुणे शहर,**
**पत्ता.:** २, साधु वासवानी रोड, कॅम्प पुणे ४११००१.
**दुरध्वनी क्रमांक.:** ०२० -२६२०८२०२
**फॅक्स क्रमांक.:** ०२०- २६१२८१०५
**E-mail :-** cp.pune@nic.in,**W Add.:-** www.punepolice.co.in,

जा.क्रमांक/अभि-५/उपहारगृह-निवीदा/२०२३ ९७६९ दिनांक २५/०९/२०२३

# सुचना- उपहारगृह भाडेतत्वावर देणेबाबत

पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यालयातील उपहारगृह ११ महिन्याचे कराराप्रमाणे आवश्यक त्या अटी व शर्तीनुसार भाडेतत्वावर द्यावयाचे आहे. त्याबाबतच्या अटी व शर्ती पोलीस आयुक्त, पुणे शहर पोलीस दलाचे संकेतस्थळावर (www.punepolice.gov.in) येथे उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत

तरी, इच्छुक ठेकेदार/संस्थाचालक यांनी मोहोरबंद (sealed) दरपत्रके/निवीदा लिफाफे त्यावर **"उपहारगृह भाडेतत्वावर मिळणेसाठी"** असे स्पष्ट ठळक अक्षरात नमूद करून पोलीस निरीक्षक, कल्याण शाखा, पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ या कार्यालयामध्ये कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी १०.०० ते सायंकाळी ०६.०० या वेळेत दि. २५/०९/२०२३ पासून दि.३०/०९/२०२३ पर्यंत जमा करावेत. सदरची दरपत्रके दि.०३/१०/२०२३ राजी उघडण्यात येतील.

**दरपत्रके खालील नमुद नमुन्याप्रमाणे सादर करावीत.**

| तपशिल | वापर | रक्कम रुपये (मासिक/दरमहा) |
|---|---|---|
| भाडेतत्वावर उपहारगृह चालविणेबाबत | खादयपदार्थ बनविणे / विक्री करणे | रुपये |

अधिक माहितीसाठी संपर्क :- श्री दशरथ पाटील, पोलीस निरीक्षक,कल्याण शाखा, शिवाजीनगर पोलीस मुख्यालय, पुणे ५ दूरध्वनी क्रमांक :- ९८२३४ २८४९४

(रोहिदास पवार)
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय
पोलीस अधीक्षक कार्यालय,पुणे ग्रामीण

प्रत कार्यवाहीसाठी :

**(१) पोलीस निरीक्षक, कल्याण शाखा, शिवाजीनगर, पुणे**

- सदरची जाहिरात सुचना स्थानिक मराठी २ वृत्तपत्रांमध्ये व इंग्रजी १ वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी
- त्याबाबत प्राप्त होणारी देयके प्रमाणित करुन सदरची देयके शासकीय दराप्रमाणे आकारली असल्याचे तपासून इकडील कार्यालयास सादर करावीत.
- दरपत्रके खालील नमूद केलेल्या रकान्यामध्ये सादर करावी

| **तपशील** | **वापर** | **रक्कम रुपये मासिक/दरमहा** |
|---|---|---|
| भाडेतत्वावर उपहारगृह चालविणेबाबत | खादयपदार्थ बनविणे/ विक्री करणे | रुपये |

- जे इच्छुक ठेकेदार/ संस्थाचालक यांनी सोबत जोडलेल्या अटी व शर्तीस अधीन राहून सदर उपहारगृह चालविण्यास तयार असतील त्यांची दरपत्रके सिलबंद असल्याची खात्री करुन सदरची दरपत्रके निविदा उघडणेकामी एकत्रित या कार्यालयास दिनांक २९/०९/२०२३ पर्यंत या कार्यालयास सादर करावीत.

**(२) पोलीस निरीक्षक, संगणक विभाग, पुणे**

- केवळ वरील जाहिरातीचा मजकुर अटी व शर्तीच्या सहपत्रासह संकेतस्थळावर प्रसिध्द करावा.

**पोलीस आयुक्त, पुणे शहर आवारातील मुख्य इमारतीच्या आवारामध्ये असलेले उपहारगृह भाडेतत्वावर देणेबाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे.**

## अटी व शर्ती

१. दरपत्रके सादर करण्याच्या दिनांकानंतर/मुदतीनंतर प्राप्त होणारी दरपत्रके स्विकारण्यात येणार नाही.

२. यापुर्वी हॉटेल /उपहारगृह इ. चालविणेबाबतचा अनुभव असल्यास त्याप्रमाणे सक्षम पुरावा दर्शविणारा अभिलेख कागदपत्रांमध्ये सामिल करावा.

३. सद्दस्थितीत हॉटेल /उपहारगृह चालवित असल्यास त्याबाबत मागील ३ वर्षातील ITR व तत्सम कागदपत्रे (आधारकार्ड,पॅनकार्ड,रहिवासी दाखल इत) सादर करावीत.

४. सदर उपहारगृहाच्या आवारात पुर्वपरवानगी शिवाय कुठल्याही प्रकारचे बांधकाम अथवा बदल करता येणार नाहीत.

५. सदर उपहारगृहाच्या वापराचा कालावधी ११ महिण्याच्या मुदतीनंतर संपेल. तथापी मुदत संपल्यानंतर पुढील मुदत वाढवून देण्याचा व नवीन करारपत्र तयार करणेबाबतचा अथवा रद्द करण्याचा निर्णय पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना राहील.

६. सदर उपहारगृह पोलीस विभागाचे असल्याने पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या सुचनेनुसार केव्हाही पोलीस विभागासाठी वापरण्यात येईल. तसेच आवश्यकता भासेल त्यावेळी उपहारगृहाचा ताबा पुर्वसुचनेशिवाय व्यक्ती/संस्थेकडून काढून घेण्याचा निर्णय पोलीस आयुक्त, पुणे शहर या कार्यालयाचा असेल.

७. सदर उपहारगृहामध्ये कोणताही गैरप्रकार किंवा बेशिस्त वर्तन होणार नाही याची सर्वस्वी खबरदारी ठेकेदार यांची असेल.

८. उपहारगृहाच्या परिसरात कोणाबरोबरही भांडण तंटा व इतर कुठल्याही प्रकारचा गुन्हा घडल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारीसुध्दा संबंधित ठेकेदार यांचीच असेल.

९. सदर उपहारगृहाच्या वापरावरती पोलीस निरीक्षक,कल्याण शाखा पुणे शहर यांची देखरेख राहील. उपहारगृहाच्या वापराबाबत असलेल्या कोणत्याही अडचणीबाबत त्यांचेशी सल्लामसलत करता येईल.

१०. उपहारगृह वापरताना इतर कोणत्याही सोई सुविधा आवश्यक असल्यास पोलीस निरिक्षक कल्याण शाखा यांचे मार्फतीने आपल्या मागण्या नोंदविण्यात याव्यात. ग्राह्य मागण्यांच्या पुर्ततेसंबधी विचार करण्यात येईल.

११. उपहारगृहाचे प्रत्येक महिण्याचे भाडे कार्यारंभ आदेश दिलेल्या दिनांकाप्रमाणे दर महिन्याला रोखपाल पोलीस कल्याण निधी लेखा शाखा, पुणे शहर यांचे कडे आगाऊ जमा करावे लागेल.

१२. उपहारगृहाचे दरमहा विदयुत देयक उपहारगृह चालकाने स्वत: भरणा करणे आवश्यक लागेल.

१३. उपहारगृह वापरताना झालेल्या मोडतोड, नुकसानीची सर्वस्वी जबाबदारी ही उपहारगृह चालकाची असेल. तसेच करार संपुष्टात येताना उपहारगृहाचे काही नुकसान झाल्याचे आढळुन आल्यास त्याची नुकसान भरपाई संबंधित उपहारगृहचालक त्यांनी जमा केलेल्या अनामत रक्कमेतून वसुली केली जाणार असुन अशी रक्कम वसुल करताना उपहारगृहचालक यांची कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

१४. सदर प्रकरणी उपहारगृहचालक यांनी ठरवून दिलेली अनामत रक्कम म्हणून कार्यारंभ आदेश दिलेनंतर १५ दिवसात रोखपाल, पोलीस कल्याण निधी, यांचेकडे धनादेशव्दारे कार्यालयीन वेळेत जमा करावी लागेल. सदरची रक्कम भरावयास विलंब झाल्यास त्यापुढील प्रत्येक दिवसाला **रु.५००/- विनापरतावा** दंडनिय शुल्क आकारण्यात येईल.

१५. उपहारगृह देखभाल दुरुस्ती खर्च या कार्यालयाच्या परवानगीने संबंधित ठेकेदार/व्यक्ती/संस्थाचालकांनी करावयाचा आहे.

१६. उपहारगृहामध्ये आवश्यकतेप्रमाणे आग प्रतिबंधक उपकरणे ठेकेदार/व्यक्ती/ संस्थाचालकांनी लावणे आवश्यक राहील.

१७. पोलीस अधिकारी/अंमलदार यांना कार्यालयामध्ये चहा,कॉफी, नाश्ता व जेवण पुरविण्याची व्यवस्था असावी. उपहारगृह चालक व सेवक यांची ग्राहकांशी वर्तणूक सौदाहार्याची ठेवणे गरजेचे राहील.

१८. **उपहारगृहमध्ये कामासाठी ठेवण्यात येणारे कामगार हे अल्पवयीन नसावेत.**

१९. उपहारगृहातील सर्व पदार्थाचा दर्जा उत्तम असावा. उपहारगृहात वैविध्यपुर्ण पदार्थ ठेवणे अनिवार्य आहे. उपहारगृह फक्त रविवारी बंद ठेवता येईल. परंतु आवश्यकतेनुसार कार्यालयाकडुन चालु ठेवणेबाबत कळविल्यानंतर रविवारी सुध्दा उपहारगृह सुरु ठेवावे लागेल.

२०. उपहारगृहामध्ये वापरण्यात येणाऱ्या सामुग्रीमध्ये कोणत्याही प्रकारची भेसळ नसावी.

२१. उपहारगृहत पुरविण्यात येणाऱ्या खादय पदार्थ अथवा व्यवस्थेबद्दल तक्रार आल्यास परिणामी उपहारगृहाचा करार कोणत्याही क्षणी रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

२२. उपहारगृह व परिसर नेहमी स्वच्छ ठेवावा. ओला कचरा व सांडपाणी यांचा व्यवस्थित निचरा करावा.अस्वच्छतेमुळे पोलीस अधिकारी/अंमलदार यांचे आरोग्य बिघडणार नाही याची काळजी घेणे उपहारगृह चालकांची जबाबदारी असेल.

२३. उपहारगृहामध्ये ठेवण्यात येणाऱ्या पेय,थंड पेय,खाद्य पदार्थ इत्यादीचे दरपत्रक उपहारगृहामध्ये दर्शनी भागावर लावणे आवश्यक असेल. सदर दरांमध्ये पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे परवानगी शिवाय कोणतेही बदल करता येणार नाहीत.

२४. या कार्यालयाकडून उपहारगृह चालविणे करीता उपहारगृहामध्ये असलेले सर्व साहित्य, करार संपल्यानंतर सुस्थितीत कार्यालयास परत देण्याची जबाबदारी सर्वस्वी उपहारगृचालकाची असेल.

२५. करार काळात पोलीस उपहारगृहासाठी लागणारा दुरुस्तीचा खर्च उपहारगृहचालकाने स्वतः करावा लागेल.

२६. उपहारगृहासाठी आवश्यक असणारे व्यावसायिक परवाना/स्वास्थ्य परवाना/अन्न व औषध प्रशासन विभाग इ. संबधित कार्यालयाकडून प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उपहारगृह चालकाची राहील.

२७. सदरचे उपहारगृह बंद करावयाचे असल्यास लिहून देणार यांनी ३ महिना अगोदर लेखी स्वरुपात पुर्व सुचना देणे बंधनकाराक राहील. तत्पुर्वी उपहारगृह बंद केल्यास अनामत रक्कमेतून पुढील एक महिन्याचे भाडे कपात करुन अनामत रक्कम परत करण्यात येईल.

२८. या कार्यालयाचे उपहारगृह चालविण्यास ज्या निविदा धारकाची निवड करण्यात येईल त्यांनी या कार्यालयास रुपये ५००/- च्या स्टॅम्पपेपर नोटरी सहीत करार करुन या कार्यालयास सादर करावा.

(रोहिदास पवार)
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय
पोलीस अधीक्षक कार्यालय,पुणे ग्रामीण